दै. गोदातीर दि. 23/01/25

# अपहृत बालिकेची सुखरूप सुटका

## एका महिलेसह तिघांना अटक, माळाकोळी पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**– इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या सात वर्षीय बालिकेला फूस लावून अज्ञात व्यक्तीने तिचे अपहरण केल्याप्रकरणी माळाकोळी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान पोलिसांनी बालिकेचा शोध घेऊन आरोपीच्या त्याच्या घरातच मुसक्या आवळल्या.

लोहा तालुक्यातील लिंबोटी येथील सात वर्षीय बालिका कंधार तालुक्यातील मोहिजा परांडा येथे आजोळी आजी, आजोबासोबत शाळा शिकण्यासाठी मागील दोन वर्षापासुन राहत होती. ती मोहीजा येथे इयत्ता दुसऱ्या वर्गात जि.प. शाळा येथे शिकत होती. २० रोजी सायंकाळी ४ वाजता शाळेतून आल्यानंतर ती सायंकाळी पाचच्या सुमारास खेळण्यासाठी घरातून बाहेर गेली. ती बराच वेळ घरी परत न आल्याने तिचा शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. तेथील नातेवाईकांनी तिच्या वडिलांना फोनवर वरील हकींकत कळविली, तेव्हा वडिलांनी मोहीजा परांडा येथे जावून तिचा शोध घेतला असता ती कुठेही मिळुन आली नाही. त्यानंतर वडीलांनी माळाकोळी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान पोलिसांनी तात्काळ शोध घेतला असता सदर बालिका आरोपी शेषराव गायकवाड याच्याच घरात आढळून आली. आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी व्यंकटराव कदम यांच्या फिर्यादीवरून म ळाकोळी पोलिसांनी चंद्रकांत शेषराव गायकवाड (वय ३८), शेषराव गणपती गायकवाड (वय ६०), शोभाबाई शेषराव गायकवाड (वय ५५) यांच्याविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक राणी भोंडवे करत आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व त्यांची टीम, माळाकोळी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय नीलपत्रेवार, पोलीस उपनिरीक्षक राणी भोंडवे यांचे कौतुक केले.

दै. मराठवाडा दि. 23/01/25

# अपहृत मुलीचा पोलिसांनी घेतला शोध

## दोन दिवसांपासून होती बेपत्ता; नातेवाईकांचा जीव पडला भांड्यात

लोहा (वार्ताहर) – मागील दोन दिवसांपूर्वी मोहीजा परंडा येथील इयत्ता पहिल्या वर्गात शिक्षण घेणारी सात वर्षीय मुलगी दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झाली. प्रारंभी कुठे खेळत असेल, येईल थोड्या वेळात असे वाटत असतांना रात्र झाली तरी चिमुरडी आली नसल्याने धाकधूक वाढलेल्या तिच्या पालकांनी माळाकोळी पोलीस ठाणे ता. लोहा गाठून तक्रार नोंदविली; मात्र पोलिसांनी हरवली असल्याची नोंद घेतली. दुसऱ्या दिवशी पोलिसांत अपहरणाची तक्रार नोंदविण्यात आली.पोलिसांनी दिवसरात्र एक करून अपहरण झालेल्या मुलीचा शोध घेतल्यानंतर दोन दिवसांनी चिमुरडी गावातच मिळून आली.

कंधार तालुक्यातील मोहिजा परंडा येथील इयत्ता पहिल्या वर्गात शिकणारी प्रांजली व्यंकट कदम (वय ७) ही गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत पहिल्या वर्गात शिक्षण घेते. दि. २० रोजी सोमवारी दुपारी शाळेतून आल्यानंतर तिच्या आजीने तिला बिस्कीट दिले. ते खाऊन ती शेजारील मुलांसोबत खेळण्यास घराबाहेर पडली. सायंकाळ झाली ती घरी आली नसल्यामुळे तिच्या आजीने प्रांजलीच्या आईला लिंबोटी येथे निरोप पाठविला. घरच्यांनी गावात शोधाशोध केली परंतु ती



मिळून आली नाही. रात्री उशीर झाला तरी चिमुरडी घरी आली नसल्यामुळे कुटुंबियांची धाकधूक चांगलीच वाढल्याने त्यांनी माळाकोळी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी प्रारंभी हरवल्याची नोंद घेतली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तिच्या अपहरणाची तक्रार घेण्यात आली. पोलिसांवर कुटुंबिय, समाज माध्यम आणि वर्तमानपत्राद्वारे दबाव वाढत असल्याने पोलिसांसमोर मुलीला सुखरूप शोधणे हे मोठे आव्हान होते. अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि संपूर्ण पोलीस कर्मचारी सर्व शक्यता, बारक शोधत असतांना दोन दिवसानंतर प्रांज कदम ही गावातीलच एका घरात बं ठेवली असल्याची खात्रीलायक मा मिळाल्यावरून पोलिसांनी अप झालेल्या चिमुरडीला दि. २२ जाने रोजी दुपारी ताब्यात घेतले. तिची वैद्य तपासणी करण्यात येणार असल माहिती समजते. तिचे अपहरण कुणी व कोणत्या उद्देशाने केले तपास पोलीस घेत असल्याचे माळा पोलिसांकडून सांगण्यात आले आहे प्रांजली मिळून आल्याने कदम कुटुं जीव भांड्यात पडला.